# २१. एकविसाव्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हाने

२१ व्या शतकाची सुरुवात झाली, ती महिला सक्षमीकरण वर्षाने. २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून शासनाने घोषित केले. २००१ ते २००५ हा कालावधी परिवर्तन प्रक्रियेचा कालावधी म्हणून घोषित करण्यात आला. पण हा दस्तऐवज पाहिजे त्या प्रमाणात समाजापर्यंत पोहोचला नाही. वास्तविक १९९५ मध्येच, अशाप्रकारचे धोरण जाहीर करण्याची घोषणा शासनाने केली. १९७४ ते १९७८ या काळातील पंचवार्षिक योजनेपासून महिला कल्याण व विकास यांच्याबाबत टाकण्यात येणाऱ्या पावलामध्ये लक्षणीय बदल झाला आहे. १९९० मध्ये संसदेच्या भावनेवरून राष्ट्रीय घटनेत १९९३ मध्ये करण्यात आलेल्या ७३ व्या व ७४ व्या दुरुस्त्यांद्वारे महिलांकरिता स्थानिक समित्या, पंचायती व नगरपालिकांमध्ये राखीव जागांची तरतूद करण्यात आली. महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी कार्यरत असणाऱ्या विविध आंतरराष्ट्रीय परिवारांना व मानवी हक्कासाठी लढणाऱ्या संस्थांना भारताने रीतसर मंजुरी दिली. १९९३ मध्ये 'कन्व्हेन्शन ऑन एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्मस् ऑफ डिस्क्रीमिनेशन अगेन्स्ट वुमेन' (महिलांविरुद्ध सर्व प्रकारच्या भेदभावांच्या उच्चाटनाबाबतची परिषद) ह्या परिषदेला मान्यता दिली.

ह्याशिवाय 'बिजींग डिक्लरेशन' आणि 'प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन' यांच्या अंमलबजावणीकरिता पुढील कृती कार्यक्रम व प्रोत्साहनाच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाच्या सूत्रात स्वीकारण्यात आलेल्या 'स्त्री-पुरुष समता व विकास' आणि '२१ व्या शतकाकरिता शांतता' या दस्तऐवजाला भारताने मान्यता दिली. ह्या धोरणात नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये देण्यात आलेल्या वचनांची तसेच महिला सक्षमीकरणाशी संबंधित क्षेत्राची नोंद घेण्यात आली. परंतु घटना, कायदे, धोरणे, योजना, कार्यक्रम व त्यासंबंधीची यंत्रणा यांनी प्रतिपादन केलेली ध्येय आणि भारतीय महिलांची वस्तुस्थिती यांच्यात फार मोठे अंतर आहे. शासनस्तरावर विविध योजना फारच आकर्षक आहेत, पण वस्तुस्थिती काय आहे? वस्तुस्थिती आहे 'विरोधाभास'. एकीकडे स्त्री ही चंद्रावर चालली, पायलट बनली, तर दुसरीकडे तिला जीवन जगण्यापासूनही वंचित केले जाते, हे आमच्या भारतीय समाजाचे दृश्य आहे. एकीकडे अद्यावत् ज्ञान संपादन केलेली, आकाशालाही कवेत घेऊ पाहणारी उच्चविद्याभूषित स्त्री, तर त्याचबरोबर दुसरीकडे शिक्षणाचा गंध नसलेली, आकाश कवेत घेणे सोडाच, पण आकाशाचे दर्शनही न घेऊ शकणारी स्त्री, हा विरोधाभास. ही आमच्या समाजाची २१ व्या शतकाची वास्तविकता आहे. हा 'विरोधाभास' हेच आजचे सत्य आहे. हा विरोधाभास हेच आजचे खरे आव्हान आहे. 'स्त्री सक्षमीकरण वर्षा'मध्ये आम्हाला ह्या विरोधाभासाचे चिंतन करून तो विरोधाभास

दूर करावा लागेल.

ह्या विरोधाभासासोबतच आणखी काही आव्हाने आज आमच्यासमोर आहेत, जी समाजमन पोखरत आहेत. समाजमन कमकुवत बनवीत आहे.

ही आव्हाने आहेत –


(१) शिक्षण,
(२) स्वास्थ्य,
(३) शांतता,
(४) सुरक्षा,
(५) नैतिकता.

ही स्त्री सुधारणेची पंचशील तत्त्वे आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्त्रीजीवन जर समृद्ध बनवायचे असेल तर ह्या पंचशील तत्त्वांचा सर्वप्रथम प्रत्येक राष्ट्राला, प्रत्येक समाजाला व प्रामुख्याने प्रत्येक स्त्रीला स्वीकार करावा लागेल. जोवर व्यक्तिगत स्तरावर स्त्री पंचशील तत्त्वाचा अंगीकार करीत नाही, तोवर भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री सक्षमीकरणाचे कितीही कायदे केले, कितीही समाजाची मानसिकता बदलविण्याचा प्रयत्न केला, तरी स्त्री सक्षम बनणार नाही. म. फुले म्हणत, ''स्त्री मुक्ती हवी असेल तर सर्वप्रथम स्त्रियांनी स्वतः वाघीण बनायला हवे.'' मुळात जाऊन विचार केला, तर व्यक्ती ह्या स्तरावर विचार करता, स्त्री ही 'अक्षम' आहे, 'अबला' आहे, हीच बाब मुळात मनाला न पटणारी आहे. कारण आध्यात्मिक स्तरावर विचार करता, 'मी म्हणजे माझा देह' नसून 'माझे आत्मतत्त्व हेच माझे अंतीम सत्य आहे' ही भावना प्रत्येक स्त्रीमध्ये निर्माण करण्याची आवश्यकता आहे. तिची ही आत्मभावना जेव्हा प्रबळ होईल तेव्हा आत्मप्रचीती येऊन तिच्या क्षमतेची तिला जाणीव होईल. ह्या सोऽहम् अनुभूतीने विश्वाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य तिच्या ठिकाणी उत्पन्न होईल. ही भावना जर प्रत्येक स्त्रीची प्रबळ झाली तर स्त्रीलाच आपल्या सक्षमीकरणाची जाणीव निर्माण होईल. म्हणूनच २१ व्या शतकातील पंचशील तत्त्वांचा पुरस्कार ह्या शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.



ह्या पंचशील तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी खालील विवेचन सुचविण्यात येत आहे –


(१) **शिक्षण** – एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंबाचा उद्धार करते, पण शिक्षण म्हणजे काय? आज स्त्री साक्षर व्हावी म्हणून शासनस्तरावर अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. पण केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण का? महात्मा गांधी म्हणत, "Literacy is not the end of education, not even beginning. By education I mean drawing out of best in man body, mind and spirit." 'व्यक्तीमधील उत्कृष्टतेची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण.' शिक्षणाची ही परिभाषा सर्वांग परिपूर्ण आहे. आज व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासावर शिक्षणाच्या माध्यमातून भर दिला जातो. पण आमच्या देशातील विरोधाभास असा की फक्त शहरातल्या स्त्रियांचा व्यक्तिमत्त्व विकास प्रचंड होतोय पण खेड्यातील दुर्गम भागातील स्त्री आजही कागदोपत्री साक्षर आहे. विविध प्रचारमाध्यमांच्याद्वारे प्रौढ साक्षरता, स्त्री साक्षरतेबाबत awareness निर्माण करण्याचा प्रयत्न जोरात होतो. पण प्रत्यक्ष शिक्षणाचा विचार करता खरोखरच आपल्या स्थानिक गरजांना अनुसरून किती स्त्रियांचे शिक्षण होते. 'व्यक्ती जर शिक्षणापर्यंत पोहोचत नसेल तर शिक्षणाने त्या व्यक्तीपर्यंत पोहोचायला हवे' असे शिक्षणतज्ज्ञ म्हणतात. पण भारताचा दैवदुर्विलास असा, की आमची शिक्षणव्यवस्था अद्यापही पंगु आहे. ती प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचू शकत नाही. विचाराची दुसरी बाजू अशीही आहे की तहानलेल्या व्यक्तीला नदी दाखविण्याचे काम आपण करू शकतो पण पाणी पिण्याचे काम मात्र तहानलेल्या व्यक्तीलाच करावे लागेल. पण येथे समस्या अशी आहे की ही तहानच निर्माण झालेली नाही किंवा तहानेची जाणीवच नाही, किंवा तहान लागली, जाणीवही आहे पण ती अभिव्यक्त करू शकत नाही. अशा परिस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून ह्या 'स्व'ची निर्मिती हे शिक्षणाचे पहिले कर्तव्य ठरते. आमची शिक्षण प्रणाली आज एवढी सक्षम बनायला हवी व ह्या शिक्षणातून स्त्रीचा खालील दोनही स्तरांवर विकास व्हावयास हवा व तिचे व्यक्तिमत्त्व प्रभावी बनावयास हवे.




अगदी तळागाळाच्या स्त्रियांपर्यंत ही बाब पोहोचावयास हवी.

(२) **स्वास्थ्य** – स्त्री ही पुढील पिढीची निर्माती आहे. ती जर सुदृढ असेल तर पुढची पिढीही सुदृढ निपेल. आज आम्ही पाहतो, की येणारी नवीन पिढी ही शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून अपंग आहे. त्यामुळे मानसिक अपंग मुलांची संख्या वाढते आहे. त्यांच्या वेगवेगळ्या समस्यांना आज आपल्याला तोंड द्यावे लागत आहे. परिणामी


एका अशक्त पिढीला आम्ही जन्म देत आहोत. त्या सर्वांना जबाबदार असणाऱ्या स्त्रीचे स्वास्थ्य कायम ठेवणे व चांगले ठेवणे अतिशय अगत्याचे आहे. हे स्वास्थ्य खालील तीन प्रकारचे आहे –




जसे स्त्रीचे शारीरिक स्वास्थ्य महत्त्वाचे तद्वतच तिचे भावनिक व मानसिक स्वास्थ्यही महत्त्वाचे आहे. आज मानवी संबंध अतिशय गुंतागुंतीचे झाले आहेत. पदोपदी नवनवीन ताणतणाव घेऊन ते आपणासमोर येतात. ह्या ताणतणावाच्या परिस्थितीत स्त्री अधिक भरडली जाते कारण प्रत्येक समस्येमध्ये ती स्वतःला गुंतवून घेते. त्या प्रत्येक ताणतणावाचा ती स्वतःला एक घटक समजते. भावनिकदृष्ट्या तिचा अतिशय कोंडमारा होतो. परिणामी एक प्रकारचा मानसिक व भावनिक हिंसाचार ती पदोपदी अनुभवत असते. त्याशिवाय एवढे सगळे कष्ट सोसूनही पितृप्रधान पद्धतीमुळे व पुरुषांच्या कौटुंबिक वर्चस्वामुळे तिचे कुटुंबातील स्थानही नगण्यच. त्यामुळे विविध कौटुंबिक संघर्षांना तोंड द्यावे लागते. नव्हे कौटुंबिक हिंसाचाराचा बळी जातो तो केवळ स्त्रीचा. ही बाब खेडे असो की शहर असो, श्रीमंत असो की गरीब असो घटना फक्त बदलणार, पण स्वरूप मात्र तेच राहणार. हा विरोधाभास बदलायला हवा. आरोग्य संघटनांनी स्त्री आरोग्याबाबत कितीही जागरूकता दाखविली तरी जोवर समाजमन बदलत नाही, तोवर स्त्री स्वास्थ्य सुधारणार नाही. तोवर सुदृढ पिढी निर्माण होणार नाही, कारण सुदृढ माताच सुदृढ पिढी घडवू शकते.

(२) **शांतता** – २१ व्या शतकातील पंचशील तत्त्वाचे अतिशय महत्त्वाचे व केंद्रबिंदू असणारे तत्त्व आहे शांतता. प्राचीन काळी शांतीपाठ म्हणण्याची पद्धत होती. आजही विविध शाळांमधून शांतीपाठ शिकविण्यात येतो. पण ह्या शांतीपाठातून खरोखरच शांती आम्ही निर्माण करू शकलो का? ह्या तीनही स्तरांवर आम्ही शांती प्रदान करू शकतो का? प्रार्थनेच्या शेवटी आम्ही म्हणतो, ॐ शांती! शांती! शांती! पण ह्या तीनही

स्तरावर तर अशांतता आहेच. व्यक्ती म्हणून स्त्री मानसिक व भावनिकदृष्ट्यासुद्धा अशांत आहे. कारण विविध समस्यांनी तिला घेरले आहे.




ह्या विविध समस्यांनी तिला अशांत केले आहे. शिवाय विविध क्षेत्रात असणाऱ्या समस्यांमुळे तिची शांती भंग पावते आहे. मानवी मन जर अशांत असेल तर ते कोणतीच प्रगती करू शकत नाही. स्त्री याला अपवाद नाही. ह्या अशांत मनाला कधीही सुख लाभू शकत नाही. ह्या अशांतीमुळे स्त्रीमनाची निर्भयता ही लोप पावत आहे. परिणामी भयग्रस्त कुटुंब आज आपणास आढळतात. ह्यामुळे स्त्रीच्या मनाचा समतोल ढासळतो व त्यामुळे कुटुंबाचाही समतोल ढासळतो. वैश्विक स्तरावर आज शांततेची आवश्यकता आहे.

**(४) सुरक्षितता** – सुरक्षिततेचा प्रश्न हा दिवसेंदिवस अधिकाधिक गहन बनत आहे. मानवी आयुष्याची जोखीम आज खूपच वाढली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील दहशतवाद, देशांतर्गत दहशतवाद ह्यामुळे राष्ट्राची, पर्यायाने समाजाची, त्याचप्रमाणे व्यक्तींची सुरक्षितता धोक्यात आली आहे. एक मात्र खरे, की आज समाजात स्त्री सुरक्षित नाही. एक काळ असा होता की स्त्रीकडे माता–भगिनी ह्या दृष्टिकोनातून बघण्यात येत होते. स्त्रीही समाजात निर्भयतेने वावरत होती. आज मात्र पदोपदी काटेच अंथरले आहेत. आज स्त्री आपल्या घरात सुरक्षित नाही. कधी तिला हुंडाबळी बनविले जाते. कधी तिच्यावर बलात्कार होतो, कधी तिच्या अब्रूचे धिंडवडे काढले जातात. 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवतः' ही आमच्या देशाची संस्कृती आहे. शक्तीच्या रूपात आम्ही स्त्रीकडे पाहावे, हा धडा आम्हास शालेय जीवनापासून देण्यात येतो. मग तरीही इतरांच्या स्त्रियांची अब्रू लुटण्याची, इतर स्त्रियांच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्याची आमच्या समाजाची हिंमत होतेच कशी? आजही समाजात स्त्री सुखी नाही ही वस्तुस्थिती आहे. पण आम्ही सुरक्षित नाही हे मानायला तथाकथित स्त्रीमुक्ती विचाराच्या स्त्रिया मान्य करत नाही. मूठभर लोकांनी समाज घडत नसतो. समाजात स्त्रीची होणारी ही कुचंबणा थांबवायला हवी. स्त्रीसुरक्षेची जबाबदारी शासनाने हाती घ्यायला हवी. स्त्री अबला नाही. समाजपुरुषाने तिच्यावर आघात करून तिला दुर्बल करण्याचा प्रयत्न केला आहे. आज अगदी ज्याप्रमाणे साक्षरता हा आमचा नारा आहे, त्याचप्रमाणे 'स्व'सुरक्षेसाठी प्रत्येक स्त्रीला आज सक्षम बनवायला हवे. एकीकडे स्त्रीशक्तीची उपासना तर दुसरीकडे दुर्बल स्त्री हा विरोधाभास आज कमी व्हायला हवा.

**(५) नैतिकता** – 'नैतिकता म्हणजे सद्वर्तन' ही परिभाषा आम्हाला आमच्या संस्कृतीने शिकविली. शालेय जीवनापासून आम्ही ही परिभाषा शिकत आलेलो आहोत. पण

समाजात त्याची रुजवणूक आम्हाला कधीच दिसली नाही. कधी बलात्कार, कधी खून, कधी दरोडे, कधी विविध फसवणुकीचे प्रकार. एकूण काय तर समाजाची नीतिमत्ताच ढासळली आहे. मी तर असे धाडसी विधान करते की, समाजात नीतिमत्ता राहिली आहे काय? प्राचीन काळी नीती, मूल्य हातात हात घालून समाधानात राहात होते. कुटुंबव्यवस्था ह्या नीतिमत्तेचे धडे गिरविणाऱ्या पाठशाळा होत्या. पण आज Flat संस्कृतीने आमची संस्कृती Flat केली. Apartment संस्कृतीने आमची कुटुंबे Apart केलीत. आज नीतिमत्तेचे धडे आम्हाला फक्त पुस्तकातच पाहावयास मिळतात. मला असे म्हणायचे नाही, की प्रत्येकच कुटुंबात अनीती आहे. पण सर्वसामान्यपणे आजूबाजूचा समाज हा कुटुंबाचेच विस्तारित रूप असते. जेव्हा सहावर्षाच्या कोवळ्या बालीकेवर, साठ वर्षाच्या आजीवर बलात्कार होतो, तेव्हा मन खरोखरच पेटून उठते, विदीर्ण बनते. जो आमच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग असावा, अशा नीतिमत्तेचे धडे वेगळे देण्याची आवश्यकता आमच्या राष्ट्रात भासावी, हा विरोधाभासच नाही का? हा प्रथम दूर करावा लागेल. नीतिमत्तेचा घसरत जाणारा दर्जा हे आमच्यासमोर मोठे आव्हान आहे.

२१ व्या शतकातील विविध आव्हानांपैकी हे विरोधाभासाचे आव्हान दूर करून पंचशील तत्त्वांचा अंगीकार आपणास करावा लागेल. त्यायोगे महिलांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव व्हावी याकरिता त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सकारात्मक आर्थिक धोरणाद्वारे योग्य वातावरण तयार करणे, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, नागरी, अशा सर्वच क्षेत्रात महिलांना कायदेशीर व प्रत्यक्षपणे पुरुषांच्या बरोबरीने मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याचा उपभोग घेणे शक्य व्हावे. शिवाय देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनात महिलांना सहभाग आणि संधी उपलब्ध करून देणे. आरोग्य, दर्जात्मक शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन, रोजगार, समान वेतन, कामाच्या ठिकाणी सुरक्षा इ.उपलब्ध व्हाव्यात. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या भेदभावाचा अंत करण्यासाठी न्यायिक व्यवस्था बळकट करणे, विकास प्रक्रियेत स्त्री-पुरुष समानतेचा दृष्टिकोन प्रवाहात आणणे इ. बाबी ह्या पंचशील तत्त्वाच्या माध्यमातून साध्य होऊ शकतील.